**अतितात्काळ**

क्रमांक : किमायो-२०१९/प्र.क्र.२०१/१०-अे
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

महाराष्ट्र शासन

दिनांक :- १६ ऑगस्ट,२०१९

**अजोय मेहता**
**मुख्य सचिव**

**विषय:- "प्रधानमंत्री किसान मानधन योजना (PM-KMDY)" राज्यात राबविण्याबाबत...**

संदर्भ :- केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाचे क्र.F.1-5/2019-FWS-II, दि.८/८/२०१९ चे पत्र.

प्रिय श्री./श्रीम.

"प्रधानमंत्री किसान मानधन योजना (PM-KMDY)" संपूर्ण देशात दि.९/८/२०१९ पासून सुरु करण्यात आली आहे. १८ ते ४० वयोगटातील २ हेक्टर पर्यंत शेती असलेल्या राज्यातील सर्व अल्पभूधारक व सिमांत शेतकरी (SMF) या योजनेमध्ये भाग घेण्यासाठी पात्र आहेत. पात्र लाभार्थ्यांना वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर रु.३०००/- प्रतिमाह पेन्शन मिळणार आहे. लाभार्थ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्याची सुध्दा तरतुद या योजनेत आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची नोंदणी (Enrollment) दि.९/८/२०१९ पासून सुरु करण्यात आलेली आहे. सदरची योजना केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी (Flagship) योजना असल्याने, या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी शासन परिपत्रक क्र.किसयो-२०१९/प्र.क्र.२०/११-अे, दि.४/२/२०१९ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे राहील.

गाव पातळीवरील आपले सरकार सेवा केंद्रामध्ये (ASSK) VLE मार्फत लाभार्थी नोंदणी करण्यात येणार आहे. नोंदणी करतेवेळी कोणतीही रक्कम लाभार्थ्याने भरण्याची आवश्यकता नाही. नोंदणीनंतर लाभार्थ्याच्या बँक खात्यातून लाभार्थी हिश्श्याची रक्कम Auto Debit ने विमा कंपनीकडे जमा होईल. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेमध्ये लाभ घेतलेले SMF लाभार्थी या योजनेमध्ये पात्र आहेत. त्यांची यादी तालुका/जिल्हा स्तरावर उपलब्ध आहे. या याद्या संबंधित VLE यांना तात्काळ उपलब्ध करुन द्याव्यात, जेणेकरुन लाभार्थी नोंदणी प्रक्रिया गतिमान करता येईल. तसेच गांव पातळीवर ग्रामसेवक/तलाठी/कृषि सहाय्यक यांचेमार्फत पात्र शेतकऱ्यांना माहिती देऊन व्यापक प्रमाणावर प्रचार व प्रसिध्दी करुन त्यांना नोंदणीसाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे. गावनिहाय लाभार्थी नोंदणीचे कॅम्प आयोजित करुन लाभार्थ्यांना पेन्शनकार्ड वाटपाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात यावेत. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन पत्राची प्रत व योजनेच्या मार्गदर्शक सूचनेची प्रत यासोबत जोडण्यात आलेली आहे.

..२/-

"प्रधानमंत्री किसान मानधन योजना (PM-KMDY)" योजनेअंतर्गत लाभार्थी नोंदणी प्रक्रियेमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व घटकांबरोबर समन्वय ठेवून दि.३१/८/२०१९ पर्यंत जास्तीत जास्त लाभार्थ्यांची नोंदणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

आपला स्नेहांकित,

(अजोय मेहता)

**जिल्हाधिकारी (सर्व)**

**प्रत** :-

**(१) विभागीय आयुक्त (सर्व)** - "प्रधानमंत्री किसान मानधन योजना (PM-KMDY)" योजनेची अंमलबजावणी सर्व जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(२) आयुक्त (कृषि)** - "प्रधानमंत्री किसान मानधन योजना (PM-KMDY)" योजनेसाठी राज्य स्तरावरील समन्वयक म्हणून आयुक्त (कृषि) राहतील. लाभार्थींच्या नोंदणी प्रक्रियेमध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवावा. तसेच या योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीची योग्य ती कार्यवाही तातडीने करावी.